# अवयवदानामुळे आठ जणांना जीवदान!

## हृदय प्रत्यारोपण शस्त्रक्रियांचा विक्रम; मुंबईत आतापर्यंत झाल्या ११ शस्त्रक्रिया

**सकाळ वृत्तसेवा**

मुंबई, ता. १३ : दोन दिवसांत चार जणांनी अवयवदान केल्यामुळे मुंबईत आठ जणांना जीवदान मिळाले. चार यकृत, चार किडन्या आणि एक हृदय प्रत्यारोपण या दोन दिवसांत करण्यात आले. अन्य दिवसांनंतर डोळेही दान करण्यात आले आहेत.

गुरुवारपासून दोन दिवसांत मुंबईतील गोदरेज, नानावटी आणि वाशीतील एमजीएम रुग्णालयात अवयवदान करण्यात आले. गोदरेज रुग्णालयात ७८ वर्षांच्या पुरुषाला मेंदू मृत झाल्यानंतर त्याचे यकृत आणि दोन किडन्या दान करण्यात आल्या. दोन्ही किडन्या गोदरेज रुग्णालयात उपचार घेणाऱ्या ६१ वर्षांच्या एका पुरुषाला देण्यात आल्या. धीरूभाई अंबानी रुग्णालयातील ६६ वर्षांच्या पुरुषावर यकृताचे प्रत्यारोपण करण्यात आले.

नानावटी रुग्णालयात शुक्रवारी दोन रुग्णांचे अवयव दान करण्यात आले. त्यापैकी ८२ वर्षांच्या पुरुषाने यकृत दान केले. ते ग्लोबल रुग्णालयातील ५८ वर्षांच्या पुरुषाला बसवण्यात आले. ५२ वर्षांच्या महिलेचे यकृत आणि डोळे दान करण्यात आले. ही महिला नागपाडा पोलिस ठाण्यातील हवालदार नंदकिशोर नाईक यांची पत्नी होती. नाईक यांनी पत्नीचे सर्व अवयव दान करण्यास परवानगी दिली होती. डॉक्टरांनी यकृत आणि डोळेच घेण्याचा निर्णय घेतला. यातील यकृत फोर्टीस रुग्णालयातील ३९ वर्षांच्या पुरुषाला बसवण्यात आले.

वाशीतील एमजीएम रुग्णालयात एका अपघातात मृत्यू झालेल्या ४८ वर्षांच्या पुरुषाचे हृदय, यकृत आणि दोन किडन्या घेण्यात आल्या. त्यापैकी एक किडनी एमजीएम रुग्णालयात ३८ वर्षांच्या पुरुषाला, तर दुसरी किडनी पालिकेच्या नायर रुग्णालयातील महिलेला देण्यात आली. हृदय फोर्टीस रुग्णालयातील ३६ वर्षांच्या रुग्णाला बसवण्यात आले. या शस्त्रक्रियेनंतर मुंबईत ११ हृदय प्रत्यारोपण शस्त्रक्रिया झाल्या.

